" जळगांव जिल्हा शेतमजूर युनियन, "
२०/२, बळिराम पेठ, जळगांव – ४२५ ००१.

दि. :– १८/८/१९८०.

प्रिय कॉम्रेड

आपल्या देशातील ८० टक्के भाग दुष्काळाच्या महाभयंकर संकटात सापडला आहे. तुम्हा ते माहित आहेच. भारत सरकारने याची गंभीर दखल घेतली आहे आणि कोट्यावधी रुपये दुष्काळ निवारणाच्या कामासाठी मंजूर केल्याचेही तुम्हाला माहित आहे. महाराष्ट्रामध्ये दुष्काळी परिस्थिती आहे की नाही या-बद्दल कॉंग्रेसचे मुख्यमंत्री आणि इतर कॉंग्रेस पुढारी यांचेमध्ये वाद माजला आहे. अर्थात या वादाचे मागे बहुसंख्य जनतेच्या हालअपेष्टांची काळजी हे कारण नसून पुढाऱ्यांमधिल सत्ता संघर्ष आहे हे आपण पहातो.

आपल्या राज्यामध्ये, जिल्हयामध्ये, तालुक्यामध्ये, गांवामध्ये दुष्काळी परिस्थिती आहे की, – नाही, एकंदरीत पिकांची परिस्थिती त्या मानाने बरी आहे, यावर समाधान मानून चालणार नाही, कारण इतर सर्वत्र कठीण परिस्थिती असल्यामुळे आपल्या भागातही त्याचा परिणाम झाल्याशिवाय रहाणार नाही. आणि यादृष्टीने आपण आतापासून जागे राहिले पाहीजे, आणि दुष्काळी समित्या काम कसे करतील, सरकारकडे देवू केलेली मदत सर्व गरजूंना मिळेल की नाही याकडे लक्ष ठेवले पाहीजे. आम्ही एक नवा उपक्रम १५ ऑगष्ट रोजी जळगांव येथे सुरु केला आहे. जळगांव तालुक्यातील व इतर ठिकाणचे मिळून २५ कार्यकर्ते बैठकीसाठी आले होते, त्यांत मुख्यत: हल्लीच्या परिस्थितीची माहिती देण्यात आली. यापुढे शक्यतर दर महिन्याचे एका दिवशी अशा बैठका घेण्याचे ठरविण्यात आले आहे.

गेल्या महिन्यातील आपल्या जिल्हयातील एक अत्यंत महत्वाची घटना म्हणजे जळगांव तालुक्यातील आव्हाणे या गांवी हरिजन शेतमजुरांवर झालेला क्रूर हल्ला, एका हरिजनाला जिवंत जाळण्याचा प्रकार. २६ झोपडया जाळून नष्ट करण्यात आल्या बद्दलची अत्यंत क्रूर घटना, याचा आपल्या जिल्हयात सर्वत्र निषेध करण्यात आला व त्याजागी अनेक राजकीय पुढाऱ्यांनी भेट देवून हरिजनांना सहानुभूती दाखविण्यात आली. विशेष म्हणजे या निमित्ताने रिपब्लिकन पक्षाने पुढाकार घेवून तीव्र निदर्शने केली, आणि बदल्याच्या घोषणा केल्या. आपल्या संघटनेचे पुढारी त्या गांवी कॉ. भालेराव व मोरे जावून आले. व त्यांनीही आपली सहानुभूती जाहीर केली, परंतू या सर्व प्रकरणात आपल्या संघटनेची आढळून आलेली राजकीय कमजोरी आपण लक्षात घेतली पाहिजे.

खेडयातील दलीत व इतर शेतमजूर एका बाजूने व दूसरे बाजूने धनदांडगे श्रीमंत शेतकरी यांचा संघर्ष तीव्र होत आहे. व मजुरांवर अत्याचाराचे प्रसंग वाढत आहेत, अशावेळी आपल्या संघटने मार्फत आपल्या वर्गाचा पाठिंबा जाहीर करण्यासाठी दलीत व गरीब शेतमजूर यांना त्यांचे लढयात सक्रीय पाठिंबा देण्याचे दृष्टीने आपण एक मोर्चा संघटीत करणे अगत्याचे होते. लालबावट्याची

.....२

संघटना त्यांच्या पाठीशी उभी आहे असा त्यांना दिलासा द्यायला पाहिजे होता. नुसती सहानुभुती दाखवुन भागावयाचे नाही. श्रमजिवी वर्ग म्हणून त्यांच्या सभा त्यांच्या समोर ताबडतोब मोठया संख्येने जावून त्यांना धीर द्यावयास पाहिजे होता असे केले तरच धनदांडग्यांना वचक बसेल आणि आपल्या संघटनांचा दरारा निर्माण होईल. हे आपण केले नाही, उलट रिपब्लिकन पक्षाने सहाजिकच दलीत विरुध्द इ. सर्व असा प्रश्न मांडला व आपल्या जमातीच्या भावना जाग्या केल्या, याचा धोका असा आहे की, - शेतमजूर संघटनेमध्ये वर्गिय एकजूट निर्माण होण्याऐवजी जातीच्या घोषणांवर अलग मोर्चे संघटीत करण्यात येत आहे. आपल्या वर्गिय संघटनेला सर्वात मोठा धोका आहे हे आपण लक्षात घ्यावयास पाहीजे. या प्रश्नावर तुम्ही विचार करावा आणि आपल्याला या बद्दल काय वाटते ते कळवावे.

=================================
" पत्रक २ रे. "
=================================

भारत सरकार खेडयातील आवश्यक गरजेच्या वस्तूंची वाटप योजना अधिक बळकट करण्यात येत आहे, अशा वारंवार घोषणा करीत असते. इतर राजकीय पक्षांचेपुढारी या योजनेवर टीका करतात आणि तेही ही योजना जास्त चांगल्या रितीने अंमलात आली पाहिजे अशी मागणी करतात.

सरकारी घोषणा व पुढा-यांची मागणी लोकसभेत विधिमंडळात व इतरत्र वेळोवेळी करण्यात येत असते परंतू प्रत्यक्ष व्यवहारात आपल्याला निराळाच अनुभव ये

खेडयातील दुकानांवर वेळेवर धान्य व इतर वस्तूंचा पुरवठा होत नाही. धान्य खराब असते, साखर व गोडेतेल याचे योग्य वाटप होत नाही. घासलेट कधी सरकारी भावात मिळत नाही व त्याचे मापही नीट मिळत नाही. या संबंधी आपा-पल्या गांवातील व भागातील कार्यकर्त्यांनी जागे रहाणे व होत असलेल्या लबाडीच्या विरुध्द लोक संघटीत करणे हे काम आपणास करावयाचे आहे. यादृष्टीने माहिती जमा करुन ती आमच्याकडे तुम्ही पाठवावी.

==========================
" पत्रक क्र. ३. "
==========================

भारत सरकारने खेडयातील मजुरांच्या प्रश्नासंबंधी दोन महत्वाच्या घोषणा केल्या आहेत. एक म्हणजे खेडयातील मजुरांच्या प्रश्नासंबंधी सर्वांगीण विचार करुन त्या बाबत उपाय योजना करण्यासाठी एक ७ सभासदांची कमिटी गुजराथचे पुढारी जीनाभाई डोरजी यांचे अध्यक्षतेखाली कमिटी नेमली आहे. या कमिटी समोर आपले म्हणणे मांडण्यासाठी आपल्या संघटनेला संधी मिळेल अशी आशा आहे, अर्थातच या क कमिटीचे काम संपूर्ण उपाय योजना अंमलात येण्यास अनेक वर्षे लागतील हे उघड आहे. या समितीच्या कामकाजासंबंधी आवश्यक ती माहिती

.....३

आम्ही तुम्हाला वेळोवेळी कळवू.

दुसरी म्हणजे भारत सरकारने भूमिहीन शेतमजूरांसाठी एक गट विमा योजना १५ ऑगष्ट पासून अंमलात आली असल्याची घोषणा केली आहे. आपल्या देशात एकूण जवळजवळ ६ कोटीच्यावर शेतमजूर आहेत. सरकारी योजनेप्रमाणे सरकार एकूण रु. एक हजारचा प्रत्येक मजुराच्या नांवाने वीमा कंपनीत दरसाल १० रुपये प्रमाणे रक्कम भरणार आहे. ही योजना १८ ते ६० वयामधिल शेतमजूरांना लागू होईल. शेतमजुरांना काहीही रक्कम भरावयाची नाही. ६० वर्षे पूर्ण झाल्यावर अगर त्यापूर्वी मयत झाल्यास त्या शेतमजुराच्या वारसांना एक हजार रु. मिळतील. ही योजना प्रथम तीन वर्षापर्यंन्त अंमलात राहील.

या संबंधी योग्य त्या सूचना तुम्हाला कळविण्यात येतील. परंतू आतापासुनच आपल्या गांवातील सर्व १८ ते ६० वयाच्या गटातील शेतमजूरांच्या याद्या तयार करण्याचे काम आपल्याला करावे लागेल. या संबंधी कोणासही पैसे देवू नका. तुम्हाला काही माहिती पाहिजे असल्यास आम्हाला विचारावे.

कळावे.

कॉ. स. ना. भालेराव,
अध्यक्ष,

जळगांव, दि. :- १८/८/१९८७.

कॉ. बाळू वडगुजर,
अध्यक्ष,

कॉ. व्ही. बी. मोरे,
जनरल सेक्रेटरी,

कॉ. अमृत महाजन,
सेक्रेटरी,

" महाराष्ट्र राज्य शेतमजूर युनियन. "

" जळगांव जिल्हा शेतमजूर युनियन. "

==================================

" आव्हाणे येथील दलितांवर झालेला हल्ला या संबंधी आपल्या संघटनेने १५ ऑगष्ट १९८७ रोजी झालेल्या बैठकीत असा निर्णय घेतला आहे की, - आव्हाणे येथे शेतमजूरांचा एक संघटीत मोर्चा पदयात्रेने जावून तेथे सभा घेवून दलितांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निषेध करणे व लालबावटा शेतमजूर युनियन ही झालेल्या हल्ल्याच्या विरोधात दलीतांच्या मागे खंबीरपणे उभी आहे, असा आपला या कार्यक्रमाद्वारे दलीत जनतेला सहानुभूती व हल्ला करणा-यांना वचक बसविण्यासाठी आपण हा निर्णय घेतलेला आहे, या कार्यक्रमासाठी आपण सर्व शेतमजूरांनी दि. २७ ऑगष्ट रोजी सकाळी १०-०० वाजेपर्यन्त जळगांव येथे पोहोचावयाचे आहे. तरी आपण काळजीपूर्वक लौकरात लौकर जळगांव येथे पोहोचावे.

आपला नम्र,
कॉ. व्ही. बी. मोरे.

=====================================

BOOK-POST

Printed Matter




To

कॉ. पी.के. कोडियन
सेक्रेटरी-भारतीय खेतमजदूर युनियन
अजय भवन, १५ कोटला रोड
नयी दिल्ली ११०००२

व्ही वी मोरे
२०१२, बळीराम पेठ,
जळगांव – ४२५००१

MAHARASHTRA GOVERNMENT AGAIN FLAUNTS

Its Prokulak bias

The Maharashtra Government continues to live upto its reputation of a state which zealously guards the interests of the kulak class, esp. of the sugar barons. That is why even while parading its achievements under green revolution, it fixed the lowest minimum wage for agriculture labour ( @ Rs.6/-) in the whole country. It made no efforts to revise this wage despite sustained struggle over past years. There was dharana of several thousand of agriculture labour at Bombay for three days but to no avail. Then there was a united conference at Kopargaon (Dist. Ahmednagar) two years ago attended by 15000 agriculture labourers when last Loksabha elections campaign was at its peak. There were discussions with the state labor minister & when it seemed that some progress will at last be made, the Khet mazdoor leaders were told blunths that the state government did not want to disturb the status quo.

It is in this background that recent statement of its spokesmen have to be understood. Speaking at a meeting at Poona Shri V.S.Page, who is the Chairman of the committee to revise agriculture labour wages in the state and who is the architect of the present wage structure for them, said.

"I do not understand how the centre has decided to fix Rs.11/- as the new minimum wage for agricultural labour, when we had proposed scaling it upto Rs.8/- only. The agricultural workers must get a wage which ensures their bare existence and nothing more. Granting them anything above that is dangerous for then we shall not get any labour for agricultural operations."

This has reference to employment guarantee scheme which gives rural labor a right to work and who would also be beneficiaries of the revised minimum wage. Mr. Page is concerned that if such a higher wage is given on government works, the workers would not work for kulaks unless they paid same or higher wages. Shri Page is very zealous to safeguard the interests of this class for cheap labour. In fact it was to permanently ensure this that Shri Page had introduced a novel concept in fixing minimum wage initially. He had then argued that an agricultural labour family has two earners and so a minimum wage must be fixed taking that into consideration. In fact at the recently held conference of state labour ministers at Delhi, the labour minister from Maharashtra had argued

this point and said that with two earners a khet mazdoor family in Maharashtra actually earned Rs.12/-. The central labour minister had evidently lapped up this argument going by press reports. The upshot is that the Maharashtra Government is in no mood to grant even the paltry rise of Rs.11/- per day that has been proposed

Reactions to Page's stand were swift and sharp. Com. C.D. Choudahary speaking on behalf of Maharashtra State Khet Mazdoor union fired the first shot and demanded Page's resignation as Chairman of minimum wage committee as he had openly shown hostitity to the interests of Khet mazdoors. He called for joint action by all organisations. working among agricultural labour. At Aurangabad a one day dharana was organised opposite the collectorate in which a hundred khet mazdoors and representatives of five organisations participated. The state level coordination committee of agricultural labour organisations was activised and it held its meeting on 16th June at Poona at which Shri B.N.Rajhans of Khet Mazdoor Panchyat, Com. Jeevanrao Savant representing Lal Nishan, Subhash Lomate representing Ukrand, Shri Prabhu, Shri Bhuskate and others representing Kashtakari Sanghatana and other organisations in Thane District, Com. Sagar of P.W.P. Com. C.D. Choudhary and others participated. The meeting decided that the proposed Rs.11/- kept the Khetmazdoor below poverty line and was unacceptable and demanded a minimum of Rs.15/- linked with index number. It decided to organise protest actions culminating in a state level protest action on 22nd July, all over the state. As the state assembly is meeting from 22nd June, it decided that efforts be made to raise the issue there and force the government to make a commitment. Meanwhile reports of actions by different units to protest against Page's statement and demanding his resignation continue to reach here. Undoubtely a united and sustained campaign will be required to force this kulak government to retreat and make it accept the just demands of agricultural workers.

C.D. Choudhary

Com.(C.D. CHOUDHARY)

Aurangabad
21-6-87

vd/-*